# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २७.०७.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री.देवंद्र मधुकर खैरनार, वय—३६ वर्ष, व्यवसाय— नोकरी, पद —शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग धारणी, जिल्हा परीषद अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २७/०७/२०२३ चे १७/०९ ते १७/४७ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ५०,०००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ५०,०००/— रुपये |
| ७ | घटनास्थळ | कार्यालय ग्रामीण पाणी पुरवठा,उपविभाग धारणी जि.प.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक २६/०७/२०२३ रोजी तक्रार दिली की, श्री.देवंद्र मधुकर खैरनार, शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा,उपविभाग धारणी हे तक्रारदार यांनी मौजे धोदरा गावातील घर घर जोडणी योजने अंतर्गत केलेल्या कामाच्या बिलाचे एम.बी बुक मंजुर करण्यासाठी व मेजरमेंट करुन बिल मंजुरीसाठी पाठविण्याकरीता पहिला हप्ता १,००,०००/— रु. बॅक अकांउटवर घेतला व उर्वरीत ५०,०००रु लाचेची मागणी करत असल्याबाबत लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२७/०७/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान ग्रामीण पाणी पुरवठा,उपविभाग धारणी येथील शाखा अभियंता श्री.देवंद्र मधुकर खैरनार यांनी मौजे धोदरा गावातील घर घर जोडणी योजने अंतर्गत केलेल्या कामाच्या बिलाचे एम.बी बुक मंजुर करण्यासाठी व मेजरमेंट करुन बिल मंजुरीसाठी ५०,०००/— रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले वरुन दिनांक २७/०७/२०२३ रोजी पंचासमक्ष आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक श्री.देवंद्र मधुकर खैरनार, वय—३६ वर्ष, शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा,उपविभाग धारणी, जिल्हा परीषद अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम ५०,०००/— रु. पंचासमक्ष स्विकारली वरुन आज रोजी वर नमुद इतर आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पो.स्टे.धारणी जि.अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे,अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.शिवलाल भगत, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.केतन मांजरे, पो.नि.चित्रा मेसरे, पो.नि. विजया पंधरे पो.कॉ.आशिष जांभोळे, पो.कॉ. शैलेश कडु, पो.ना. रितेश राठोड, पो.कॉ. उमेश भोपते पोउपनि.सतिश किटूकले, पो.कॉ.स्वप्नील क्षिरसागर यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१—२५५२३५५, मो.नं.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर — १०६४.

(केतन मांजरे)
पोलीस निरीक्षक

Scanned with OKEN Scanner